दै. सकाळ दि. 23/02/2024

# 'पोलिस देव होऊन आले...'

## सव्वा लाखाचा मुद्देमाल वृद्ध महिलेला केला सुपूर्द

**पोलिसांच्या कार्याचा सन्मान**

एकंदरीतच आपल्या सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण देत सिंदखेड पोलिसांनी एक नवा आदर्श समोर ठेवून माणुकीचे दर्शन घडविल्याने सिंदखेड पोलिसांचे प्रचंड कौतुक होत आहे. यावेळी शिवसेनेचे (उबाठा) विधानसभा क्षेत्रप्रमुख ज्योतिबा खराटे यांनी सहायक पोलिस निरीक्षक सुशांत किनगे यांच्यासह पोलिस कर्मचारी व होमगार्ड यांचा शाल व पुष्पहार घालून सत्कार केला.

**माहूर, ता. २२ (बातमीदार)** : वाई बाजार फाट्यावर बेवारस सापडलेल्या बटव्यातील सव्वा लाखाचा मुद्देमाल परत करताना सिंदखेड पोलिसांनी आपल्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवून एक आदर्श घडविला असून, पोलिसांच्या या कृतीचे सामाजिक स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

माहूर तालुक्यातील वाई बाजार येथे माकप नेत्या वृंदा करात यांच्या छोटेखानी स्वागत समारोहाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी पोलिस बंदोबस्त ठेवण्याच्या कामानिमित्त किनवट येथील होमगार्ड पथकाचे कर्मचारी ज्ञानेश्वर सूर्यवंशी, सचिन म्याकलवार यांच्यासह मधुकर जाधव, एन.एन. जुनगरे व विजय दासरवार हे बंदोबस्ताकामी हजर होते. दरम्यान, वाई बाजार येथील फाट्यावर चहाच्या एका टपरीवर त्यांना एक बटवा आढळून आला. तो बटवा पोलिसांनी उघडून पाहिला असता त्यात दोन तोळे सोन्याच्या अंगठ्या व ५४०० (पाच हजार चारशे) रुपये दिसून आले. उपस्थित कर्मचाऱ्यांनी ही बाब डीएसबीचे पोलिस कॉन्स्टेबल पवार यांना सांगितली.



**माहूर :** सहायक पोलिस निरीक्षक सुशांत किनगे व सहकारी कर्मचारी तसेच ग्रामस्थांच्या उपस्थितीत वृद्धेला बटवा सुपूर्द करताना.

दरम्यान, सिंदखेड पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक सुशांत किनगे यांच्या मार्गदर्शनाखाली या बटव्यात सापडलेल्या एका पावतीवरून तो बटवा मलकागुडा येथील चंद्रभागाबाई मोहिते या ८१ वर्षीय महिलेचा असल्याची माहिती मिळाली.

विशेष म्हणजे ही आजीबाई डोळ्याच्या ऑपरेशनसाठी तिच्या मुलीला सोबत घेऊन यवतमाळ येथील दवाखान्यात जात असताना वाई बाजारपासून माहूरपर्यंत निघूनही गेली होती, तर माहूर येथे पोचल्यानंतर बटवा गायब असल्याचे समजताच मायलेकींनी रडणेही सुरू केले होते. तेवढ्यात सिंदखेड पोलिसांनी फोन करून बटवा सापडल्याची माहिती देताच दोघीही परत वाई बाजार फाट्यावर आल्यानंतर सहायक पोलिस निरीक्षक सुशांत किनगे व सहकारी कर्मचारी तसेच ग्रामस्थांच्या उपस्थितीत हा बटवा त्या वृद्धेला सुपूर्द करण्यात आला. यावेळी म्हातारी व तिच्या मुलीच्या डोळ्यांत आनंदाश्रू वाहात होते, तर पोलिसांचे मनापासून आभार मानत 'पोलिस देव होऊन आले...' अशी भावनिक प्रतिक्रिया तिने दिली.

दै. देशोन्नती दि. 23/02/2024

# सापडलेले मौल्यवान साहित्य सिंदखेड पोलिसांनी केले परत

देशोन्नती वृत्तसंकलन...

**माहूर** ▪ तालुक्यातील मलकागुडा येथील दोन वृद्ध महिला यवतमाळ येथे दवाखान्यात जाण्यासाठी वाई बाजार फाट्यावर आल्या असता, त्यांच्याजवळ असलेली दोन तोळे सोने आणि ५ हजार ४०० रुपये असलेली पिशवी त्या विसरून गेल्या होत्या. त्या पिशवीवर पोलिस निरीक्षक सुशांत किनगे यांची नजर गेल्याने त्यांनी पिशवी जप्त करून त्यातील आधार कार्डद्वारे महिलांचा शोध घेऊन ती पिशवी त्यांना परत केल्याने पोलिसांच्या कार्यतत्परतेचा गौरव केला आहे.

वाई बाजार फाट्यावर २२ फेब्रुवारी रोजी मलकागुडा येथील दोन महिला चंद्रभागाबाई मोहिते (८१) व त्यांची मुलगी या दोघीजणी यवतमाळ येथे दवाखान्यात जाण्यासाठी वाई बाजार फाट्यावर येऊन हॉटेल समोरील खुर्च्यावर बसल्या होत्या. यवतमाळ जाण्यासाठी वाहन आल्यानंतर त्या पिशवी खुर्चीवरच विसरून माहूरपर्यंत निघून गेल्या होत्या. बंदोबस्तात असताना गस्तीवर असलेले सिंदखेडचे ठाणेदार सुशांत किनगे याची नजर खुर्चीवर असलेल्या पिशवीवर पडली व ती लगेच जप्त करून तपासणी करण्यात आल्याने त्यामध्ये सुभद्राबाई यांचे आधारकार्ड आणि दूरध्वनी क्रमांक मिळाल्याने त्यांनी लगेच संपर्क करून त्यांना वाई बाजार फाट्यावर बोलावून घेतले व सदर घटनेची खात्री करत पिशवी महिलेस परत केली. सपोनी सुशांत किनगे यांनी तत्परता दाखवून पिशवी त्यांना परत केल्याने येथे उपस्थित शिवसेनेचे विधानसभा क्षेत्र प्रमुख ज्योतिबा खराटे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. (ता.प्र.)

